# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा.क्र.तशिविकापु/विवि/परीक्षा शुल्क/२०१९/4983 दिनांक :- 03 DEC 2019

**परिपत्रक**

प्रति,

संचालक/प्राचार्य

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- दुष्काळ परिस्थिती तसेच "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे आलेल्या अवेळी पावसाने नुकसान झालेल्या तालुक्यातील शेतक-याचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत..

संदर्भ :- १. संचालनालयाचे पत्र २ अ/एडीएम/२०१९/८६४ दिनांक २९/११/२०१९

२. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक – एससीवायच-२०१९/प्र.क्र.२२०/म-७ दि २१/११/२०१९

३. महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक – सीएलएस-२०१९ /प्र.क्र.१९१/म-३ दि १८/११/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थाना सुचित करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्याचे आदेश संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आले आहे.

१. शासन परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत ज्या विद्यार्थ्याकडून परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत करण्यात यावे.
२. या सवलतीचा लाभ केवळ आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यापुरता मर्यादित राहिल राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेखालील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना ५० इतकी रक्कम शिष्यवृत्तीच्या स्वरुपात देण्यात येत असल्याने, या योजनेखाली परीक्षा शुल्काच्या केवल ५० इतकी रक्कम माफ करण्यात यावी . तसेच रुपये ८लाख पर्यंत कुटुबांचे वार्षिक उत्पन्न असलेल्या उर्वरीत विद्यार्थ्यिंना १०० परीक्षा शुल्काची रक्कम माफ करण्यात यावी .
३. या योजनेवरील परीक्षा शुल्क माफीसाठी विद्यार्थ्याकडून अर्ज प्राप्त करुन घेण्याची, विद्यार्थ्यास या सवलतीसाठी पात्र ठरविण्याची आणि त्याप्रमाणे विद्यापीठाकडे /मंडळाकडे परीक्षा शुल्काची मागणी करण्याची जबाबदारी संस्थेची राहिल.
४. या साठी होणारा खर्च सर्व संबंधित विद्यापीठांनी तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने स्वतःच्या जमा निधीतून भागवावा.
५. हे आदेश स्वायत्त संस्थांना देखील लागू राहतील.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत :- संदर्भिय पत्र,शासन निर्णय